# महाराष्ट्र विधानपरिषद

## विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल क्रमांक २०२

(सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

(दिनांक        मार्च, २०२१ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०२१.

# महाराष्ट्र विधानपरिषद

## विधानपरिषद आश्वासन समिती

(२०२१-२०२२)

# अहवाल क्रमांक २०२

**(सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल.)**

**(दिनांक      मार्च, २०२१ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

(तीन)

## महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन समिती

## (२०२१-२०२२)

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक **८ जानेवारी, २०२१** रोजी समितीवर नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची यादी :-

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री. विलास पोतनीस, वि.प.स. तथा समिती प्रमुख |
| २. | श्री. संजय दौंड, वि.प.स. |
| ३. | श्री. अरुण लाड, वि.प.स. |
| ४. | श्री. शरद रणपिसे, वि.प.स. |
| ५. | श्री. राजेश राठोड, वि.प.स. |
| ६. | श्री. विप्लव बाजोरिया, वि.प.स. |
| ७. | श्री. विनायक मेटे, वि.प.स. |
| ८. | श्री. सदाशिव खोत, वि.प.स. |
| ९. | श्री. रणजितसिंह मोहिते - पाटील, वि.प.स. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव
उप सचिव (विधी) पदाचा कार्यभार
(४) श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी

## महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन समिती
## (२०१७-२०१८)

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक **०६ सप्टेंबर, २०१७** रोजी समितीवर नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची यादी :-

| **अनु.क्र.** | **सदस्यांचे नाव** |
|---|---|
| **१)** | प्रा. अनिल सोले, वि.प.स.तथा समिती प्रमुख |
| **२)** | श्री.गिरिशचंद्र व्यास, वि.प.स.* |
| **३)** | श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. |
| **४)** | श्री. शरद रणपिसे, वि.प.स. |
| **५)** | श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. |
| **६)** | श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. |
| **७)** | प्रा. जनार्दन चांदूरकर, वि.प.स. |
| **८)** | श्री.नागोराव गाणार, वि.प.स. |
| **९)** | श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** |
| | **विशेष निमंत्रित** |
| **१०)** | श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव (का.)
(२) श्री.यु.के.चव्हाण, सचिव (EM)
(३) श्री.विलास आठवले, उप सचिव
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव
(५) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव
(६) श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी

**टिप :-** **(१)** सन २०१७-२०१८ या वर्षासाठी गठीत केलेल्या विधानमंडळाच्या विधानपरिषद आश्वासन समितीवरील **डॉ.परिणय फुके, वि.प.स.* यांची** दिनांक १६ जून, २०१९ रोजी राज्यमंत्रीमंडळात समाविष्ट झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १६ ऑगस्ट, २०१९ रोजी **श्री. गिरिशचंद्र व्यास वि.प.स.*** यांची नामनियुक्ती केली आहे.

**(२) श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.**** यांची दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी राज्यमंत्रीमंडळात समाविष्ट झाल्यामुळे त्यांचे समितीवरील सदस्य पद रिक्त झाले आहे**.**

## अनुक्रमणिका


| अनु-क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | **प्रस्तावना :** | **सात** |
| | विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या | |
| | मंत्रालयीन विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्रासोबतची सहपत्रे **.. .. ..** | |
| | **परिशिष्टे** | |
| २ | **परिशिष्ट एक**.-- सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीने समितीच्या कार्यकालात वगळलेली आश्वासने. तसेच संसदिय कार्य विभागाचे दिनांक १८ सप्टेंबर,२०१५ रोजीचे परिपत्रक व मा. मुख्य सचिव महोदयांचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे परिपत्रक. | |
| | **परिशिष्ट दोन**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत त्यांचे क्रमांक व विभाग. | |
| | **परिशिष्ट तीन**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील, तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनातर्फे करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय दर्शविणारे विवरण. | |
| | **परिशिष्ट चार**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काहींच्या पूर्ततेसाठी विभागाने काढलेले शासन आदेश, निर्णय, परिपत्रक किंवा पत्रक व प्रत्येक कागदपत्रे/दस्तऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या प्रत्येक कागदपत्राच्या शिरोभागी नमूद केलेले आहे. | |
| | **परिशिष्ट पाच.--** सन १९९० चे तिसरे अधिवेशन ते सन २०२० चे तिसरे अधिवेशन या कालावधीत सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी पूर्तता न झालेल्या प्रलंबित आश्वासनांच्या विवरणपत्रांची वर्ष व अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी. | |
| | **परिशिष्ट सहा**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त. | |

**प्रस्तावना**

मी, आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा **२०२ वा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे. हा अहवाल मुख्यत्वे सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेली आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधी समितीला सादर केलेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा आहे. समितीने माहे फेब्रुवारी, २०२१ पर्यंत झालेल्या बैठकांमध्ये सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या विवरणपत्रांच्या छाननीचे काम एकूण ४ बैठकांमध्ये पूर्ण केले आहे.

**उपरोक्त मंत्रालयीन विभागांच्या यथास्थिती अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सन १९९० पासूनच्या प्रलंबित आश्वासनांपैकी बहुतांश आश्वासने कालबाह्य झाली होती. काही आश्वासनांची विभागांकडून पूर्तता करण्यात आली होती. तथापि, त्याबाबतीत संसदीय कार्य विभाग किंवा विधानमंडळ सचिवालयास विभागांकडून कळविण्यात आले नव्हते. परिणामी, विभागांकडील प्रलंबित आश्वासनांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत होते. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या माध्यमातून प्रलंबित आश्वासनांचा पाठपुरावा करण्याची योजना आश्वासन समितीने हाती घेतल्यानंतर दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या आश्वासनांकडे विभागांचे लक्ष वेधण्यात आले व त्यायोगे एकप्रकारे विभागांमध्ये जागृती व सतर्कता निर्माण होऊन सभागृहात शासनाकडून देण्यात आलेली आश्वासने जनतेच्या प्रश्नांशी निगडीत असल्याने त्यांना वेळीच न्याय देणे कसे आवश्यक आहे याची विभागांना जाणीव झाली.**

**विभागाकडे प्रलंबित असलेली आश्वासने विभागाने कार्यवाही करुन ९० दिवसांच्या आत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास सादर करावयाची असतात. तथापि वर्षानुवर्षे विभागाकडून या आश्वासनांवर कार्यवाही होत नाही. सदर आश्वासनांबाबत शासनाचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांच्या साक्षी घेण्यात आल्या तरीसुध्दा सदर आश्वासनांची पूर्तता विभागाकडून झाल्याचे दिसून आले नाही. तसेच उपरोक्त साक्षींच्या अनुषंगाने विभागाकडून कोणतीच सद्य:स्थिती प्राप्त न झाल्यामुळे दिनांक १२ ऑक्टोबर,२०१८ रोजी मा.समिती प्रमुख, विधान परिषद आश्वासन समिती यांनी या संदर्भात मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना अर्धशासकीय पत्र पाठवून याबाबत नाराजी व्यक्त केली. प्रलंबित आश्वासनांच्या विषयांची समितीने छाननी करुन त्यावरील कार्यवाही प्रलंबित का राहिली याबाबत समितीच्या बैठकीमध्ये विचारणा करण्यात आली. समितीने यासंबंधी पाठपुरावा केल्यामुळे प्रलंबित आश्वासनांचा विहित वेळेत निपटारा करण्यात किंबहुना, कार्यवाहीस वेळ लागणार असल्यास त्याबाबत विहित कालावधीत कार्यवाही पूर्ण करण्यास विभागांना भाग पाडण्यात समितीला यश आले, हे नमूद करण्यास समितीला आनंद वाटतो.**

**समितीच्या एकूण कामकाजात समितीवरील सदस्यांनी बैठकींना उपस्थित राहून व कामकाजात अभ्यासपूर्ण योगदान देऊन समितीच्या कामकाजाला न्याय दिल्यानेच प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करणे समितीला शक्य झाले. तसेच, शासनाचे मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांनी समितीच्या हाकेला प्रतिसाद देऊन व स्वत: लक्ष घालून प्रलंबित आश्वासनांचा झपाटयाने निपटारा करण्यास समितीला प्रत्यक्ष सहभागाने सहकार्य दिले त्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. अशाप्रकारे प्रशासन व कार्यकारी संस्थेच्या सहकार्यातून खऱ्या अर्थाने लोकाभिमुख शासन प्रणाली नांदू शकेल असा मला विश्वास आहे.**

**परिशिष्ट "एक"** मध्ये सन २०२१-२०२२ च्या गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीने समितीच्या कार्यकालात वगळलेली आश्वासने तसेच संसदिय कार्य विभागाचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजीचे परिपत्रक व मा. मुख्य सचिव महोदयांचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे परिपत्रक. **परिशिष्ट "दोन**" मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत त्यांचे क्रमांक व विभाग. **परिशिष्ट "तीन" मध्ये** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील, तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनातर्फे करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय दर्शविणारे विवरण. **परिशिष्ट "चार**" मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काहींच्या पूर्ततेसाठी विभागाने काढलेले शासन आदेश, निर्णय, परिपत्रक किंवा पत्रक व प्रत्येक कागदपत्रे/दस्तऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या प्रत्येक कागदपत्राच्या शिरोभागी नमूद केलेले आहे. **परिशिष्ट "पाच"** मध्ये सन १९९० चे तिसरे अधिवेशन ते सन २०२० चे तिसरे अधिवेशन या कालावधीत सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी पूर्तता न झालेल्या प्रलंबित आश्वासनांच्या विवरणपत्रांची वर्ष व अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी. **परिशिष्ट "सहा**" मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त.

समितीने उक्त अहवालाच्या प्रारुपावर दिनांक **मार्च, २०२१** रोजी झालेल्या बैठकीत विचार केला व तो संमत केला.

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : मार्च, २०२१.**

**विलास पोतनीस**
**समिती प्रमुख,**
**विधानपरिषद आश्वासन समिती.**

# अहवाल

हा अहवाल सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात देण्यात आलेली आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मंत्रालयीन विभागांकडून समितीला सादर करण्यात आलेल्या विवरणपत्रांवर समितीने केलेल्या छाननी संबंधीचा आहे.

१. सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनाने दिलेल्या **२३१ आश्वासनांपैकी एकूण १६३** आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवली, ती पुढीलप्रमाणे :-

**सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व आश्वासनांची संख्या**

| अ.क्र. | सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचा दिनांक | आश्वासन क्रमांक | एकूण आश्वासने |
|---|---|---|---|
| (१) | (३) | (४) | (५) |
| **१.** | **१ मार्च, २०१७** | ९५ | **१** |
| **२.** | **३१ जुलै, २०१७** | ३, २०, २५, ३८, ६३,६४, ६५, ६६, ६९, ७५, ७९, ८०, ८४, ९१, ९२, ९४, १००, १३६, १६५, १६६, १७४, १७५, १७६, १७७, १७८, १८४, १८७, २१४, २२९ | **२९** |
| **३.** | **१४ डिसेंबर, २०१७** | १२, १५, २१, २६, २९, **३६,** ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, **७१,** ७८, ९८, १०१, ११४, १३७, १५५, १५८, १६२, १६३, १६४, १८८, १९१, २०६, २१६, २२३ | **२७** |
| **४.** | **७ मार्च, २०१८** | ४, **१३,** ३७, **१०६,** १०९, १२१, १३९, १४०, १४१, १४७, १४८, १४९, १५२, १५६, १५७, १८६, **२००,** २०२, २०३, २०५ | **१७** |
| **५.** | **१० जुलै, २०१८** | ११, २४, ५९, ६२, ७२, ८५, १५३, १५४, १५९, १६१, १६९, १७०, १७१, १७२, १७३ | **१५** |
| **६.** | **२६ नोव्हेंबर,२०१८** | ६, ७, ८, **१०,** २२, २३, ७४, ८३, ८९, ९०, १०२, १०३, १०४, १०५, १०७, १०८, ११९, १२५, १३४, **१५०,** १८९, २१७, २२७, २२८ | **२२** |
| **७.** | **२६ फेब्रुवारी,२०१९** | १, ६८, ८६, १२४, १४४, १६०, १८५, २२६ | **८** |
| **८.** | **१९ जून, २०१९** | ९, १८, २७, ३३, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ६१, ११८, १२८, १३१, १३२, १३८, २०४, २०८, २१०, २११, २१५, २१८, २३० | **२८** |
| **९.** | **१८ डिसेंबर, २०१९** | १७, **२८,** ३२, ३५, १२९, १३०, १९२, २०१, २०९, २१२, २२१ | **१०** |
| **१०.** | **२८ फेब्रुवारी, २०२०** | ३९, १२६, १२७ | **३** |
| **११.** | **७ सप्टेंबर, २०२०** | २१९, **२२४** | **१** |
| **१२.** | **१५ डिसेंबर, २०२०** | ५, १२२ | **२** |
| | | **एकूण आश्वासने** | **१६३** |

१.१ **वरील यादीत <u>ठळक अक्षरात अधोरेखित केलेली</u> आश्वासने मा.मंत्री/राज्यमंत्री आणि प्रधान सचिव यांनी केलेल्या विनंतीनुसार विधानपरिषद आश्वासन समितीने विचारविनिमय करुन वगळली आहेत.**

१.२ आजपर्यंत मंत्रालयीन विभागाकडे **एकूण ५९** आश्वासने प्रलंबित आहेत.

१.३ **सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनामधील आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधात हा अहवाल तयार करत असताना उपरोक्त कालावधीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे समितीने विचारात घेतली आहेत.**

२.१ **सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनामधील आश्वासनांच्या कार्यवाहीचे विवरणपत्र मंत्रालयीन विभागांकडून विहित मुदतीत म्हणजे ९० दिवसांच्या आत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले नाही.**

२.२ आश्वासनांची पूर्तता जास्तीत जास्त ३ महिन्यांच्या कालावधीत शासनाने केली पाहिजे व त्या कालावधीत आश्वासनांची पूर्तता करता येत नसल्यास त्यासाठी होणाऱ्या समर्थनीय विलंबाची कारणे समितीस कळविण्याबाबत तसेच विलंब टाळण्याच्या दृष्टीने घ्यावयाच्या दक्षतेबाबत समितीने मागील अहवालांमध्ये प्रत्येक वेळी आपल्या तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. आश्वासन पूर्ततेच्या सर्वसाधारण विलंबाबाबत तत्कालिन माननीय पीठासीन अधिकारी यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २००२ रोजी तत्कालिन माननीय संसदीय कार्यमंत्री, माननीय संसदीय कार्य राज्यमंत्री, मा. समिती प्रमुख, आश्वासन समिती, विधानसभा/विधानपरिषद तसेच प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग यांची याबाबत एकत्रित बैठक बोलाविली होती. याबाबत मुख्य सचिव यांनी अधिक लक्ष घालण्याबाबत या सचिवालयाकडून दिनांक १६ सप्टेंबर, २००२ रोजी अर्धशासकीय पत्र पाठविण्यात आले होते. तसेच त्या-त्या विभागासही कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन मुख्य सचिवांनीही मंत्रालयीन सर्व विभागांच्या अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांना पत्र पाठवून त्यांच्या संबंधीत विभागांकडील प्रलंबित आश्वासनांचा त्वरीत निपटारा करण्याचे निदेश दिले होते. अशा रितीने विधानमंडळ सचिवालय व राज्याच्या मुख्य सचिवांनी पाठपुरावा केल्यामुळे बऱ्याच विभागांकडून प्रलंबित आश्वासने शून्यावर आणण्याचा किंबहुना काही विभागांकडून निम्मेअधिक प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करण्याचा निश्चित प्रयत्न झाला. तथापि, तरीही अद्याप अनेक विभागांकडून विहित मुदतीत आश्वासनांची पूर्तता केली जात नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. **पुन्हा एकदा समिती सर्व मंत्रालयीन विभागांचे लक्ष वेधून अशी शिफारस करते की, आश्वासनांवरील कार्यवाहीची पूर्तता विहित मुदतीत म्हणजे ९० दिवसांच्या आत करण्याची दक्षता घेण्याचे काटेकोर पालन सर्व मंत्रालयीन विभागांकडून करण्यात यावे. तसेच जर सदर आश्वासनांवरील कार्यवाहीची पूर्तता ९० दिवसांच्या आत करता येत नसेल तर त्यासाठी होणाऱ्या समर्थनिय विलंबाची कारणे नमूद करण्यात यावीत.**

**२.३ सन २०१५-२०१६ च्या आश्वासन समितीने दिलेल्या निदेशानुसार आश्वासनांची पुर्तता विहित मुदतीत व परिपूर्णपणे करण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याच्या सूचना संसदीय कार्य विभागाकडून दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये तसेच मा. मुख्य सचिव महोदयांच्या दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय सचिवांना देण्यात आल्या आहेत.**

**२. शासकीय कार्यवाहीच्या विवरणपत्रांबाबतची सहपत्रे:-**

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आश्वासनांसंबंधीच्या कार्यवाहीची विवरणपत्रे पाठविताना आश्वासनासोबत मंत्रालयीन विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सहपत्रे जोडलेली असतात. सदरहू सहपत्रे अहवालाच्या परिशिष्ट (४) मध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

---

**परिशिष्ट - एक**

**सन २०२१-२०२२ या वर्षात खालील प्रमाणे आश्वासने वगळण्याचे निर्णय समितीने घेतले.
तसेच संसदिय कार्य विभागाचे दिनांक १८ सप्टेंबर,२०१५ रोजीचे परिपत्रक व
मा. मुख्य सचिव महोदयांच्या दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे परिपत्रक.**

---

**परिशिष्ट एक**

**सन २०२१-२०२२ या वर्षात खालील प्रमाणे आश्वासने वगळण्याचे निर्णय समितीने घेतले.**

| अ.क्र. | सन / आश्वासन क्रमांक | विभागाचे नाव | बैठकीचा दिनांक | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १) | सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक २५४ | शालेय शिक्षण विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| २) | सन २०१६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ३२२ | ग्रामविकास विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| ३) | सन २०१७ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ८६ | शालेय शिक्षण विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| ४) | सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ७० | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| ५) | सन २०१७ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक १४१ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| ६) | सन २००७ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ४६४ व ४९९ | मदत व पुनर्वसन विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| ७) | सन २०१५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ३ व ७४ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| ८) | सन २०१५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ३९१ ते ३९८ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | अमान्य |
| ९) | सन २०१६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ३१ | सामान्य प्रशासन विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | अमान्य |
| १०) | सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ४ | वित्त विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| ११) | सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक १२३ व १२६ | जलसंपदा विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | अमान्य |
| १२) | सन २०१६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक २६३ | नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| १३) | सन २०१९ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ३५ | सार्वजनिक आरोग्य विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| १४) | सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ३० | मराठी भाषा विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | अमान्य |
| १५) | सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ४७० | गृहनिर्माण विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| १६) | सन २०१७ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक १४२ | आदिवासी विकास विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | सन २०१४ चे (हिवाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ४५५ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | अमान्य |
| १८) | सन २०१६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ६१६ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| १९) | सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक २५१ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन) | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| २०) | सन २०१३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक १०५ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | अमान्य |
| २१) | सन २०१६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आश्वासन क्रमांक ५१ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | मान्य |
| २२) | सन २०१२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक ४३९ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | साक्ष घेण्यात यावी. |
| २३) | सन २०१७ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन आश्वासन क्रमांक १३८ | जलसंपदा विभाग | २ फेब्रुवारी, २०२१ | साक्ष घेण्यात यावी. |

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**परिशिष्ट - दोन**

ज्या आश्वासनांच्याबाबतीत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर अहवालाच्या दिनांकापर्यंत ठेवण्यात आली, ती आश्वासने.

**(अहवालातील परिच्छेद क्रमांक २.२ पहावा)**

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या प्रलंबित आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली त्यांचे क्रमांक व विभाग परिशिष्टात दर्शविण्यात आले आहेत.**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

# परिशिष्ट दोन
# अहवाल क्रमांक २०२ मधील सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील
# विभागनिहाय आश्वासने

| अ.क्र. | विभाग | आश्वासन क्रमांक |
|---|---|---|
| १) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | १, १८, ६१, ६२ |
| २) | वित्त विभाग | ३, ७९ |
| ३) | कृषी व पदुम विभाग | ४, ६, ७, ८, ९, ८५, २०२, २०३ |
| ४) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ५, ११, १२, ११४, १२१,१२२, २११ |
| ५) | महसूल व वन विभाग | १५, २९, ७२, ७४, ९१, १०९, ११९, १५३, १५४, २१२ |
| ६) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १७, ६८, १९२, २१६, २१७, २१८, २१९ |
| ७) | गृह विभाग | २०, ७८, १०३, १०७, १०८, ११८, १२४, १२५, १२६, १२७, १२९,१३०, १३१, १३२, १३४, १५९, १६०, १६१, १८९, २१० |
| ८) | जलसंपदा विभाग | २१, ६९, १००, १०१, २२९ |
| ९) | सार्वजनिक आरोग्य विभाग | २२, २३, १०२, २०९, २१४ |
| १०) | नगरविकास विभाग | २४, २६, २७, १०४,१०५, १२८, १४७, १४८, १४९, १५२, १५५, १५६, १५७, १५८, १६२, १६३, १६४, १८७, १९१, २०४, २०८, २१५, २२६, २२७, २२८, २३० |
| ११) | सामान्य प्रशासन विभाग | २५, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ८९, ९०, १३६, १८८, २२३ |
| १२) | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग | ३२, ३३, ३५, १३८, २०१ |
| १३) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ३७, १४० |
| १४) | मराठी भाषा विभाग | ३८, ८० |
| १५) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ३९, ६३, ६४, ९२, १३९, १६५, १६६, २०५, २०६ |
| १६) | महिला व बालविकास विभाग | ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ९८, १३७ |
| १७) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ६५, ६६, १८४ |
| १८) | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | ७५, ८६, ९४, १४४ |

| | | |
|---|---|---|
| **१९)** | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | ८३ |
| **२०)** | **विधी व न्याय विभाग** | ८४, ९५, १८५, १८६ |
| **२१)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग** | १४१, १६९, १७०, १७१, १७२, १७३ |
| **२२)** | **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग** | १७४, १७५, १७६, १७७, १७८ |
| **२३)** | **महसूल (मदत व पुनर्वसन) विभाग** | २२१ |

## परिशिष्ट - तीन
## (आश्वासनांसंबधीचे विवरण)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनाकडून सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय.**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

# सन २०1६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन

| अधिवेशन वर्ष | आश्वासन क्रमांक | एकूण आश्वासने |
|---|---|---|
| सन २०1६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन | १, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११, १२, १५, १७, १८, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २९, ३२, ३३, ३५, ३७, ३८, ३९, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६८, ६९, ७२, ७४, ७५, ७८, ७९, ८०, ८३, ८४, ८५, ८६, ८९, ९०, ९१, ९२, ९४, ९५, ९८, १००, १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०७, १०८, १०९, ११४, ११८, ११९, १२१, १२२, १२४, १२५, १२६, १२७, १२८, १२९, १३०, १३१, १३२, १३४, १३६, १३७, १३८, १३९, १४०, १४१, १४४, १४७, १४८, १४९, १५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६९, १७०, १७१, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७, १७८, १८४, १८५, १८६, १८७, १८८, १८९, १९१, १९२, २०१, २०२, २०३, २०४, २०५, २०६, २०८, २०९, २१०, २११, २१२, २१४, २१५, २१६, २१७, २१८, २१९, २२१, २२३, २२६, २२७, २२८, २२९, २३० | १६३ |

---

# परिशिष्ट - चार
## शासन आदेश, शासन निर्णय, परिपत्रके व पत्रक

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनाकडून सभागृहात देण्यात आलेल्या प्रलंबित आश्वासनांपैकी कार्यवाही करण्यात आलेल्या आश्वासनांबाबतीत विभागांकडून काढण्यात आलेले शासन आदेश, शासन निर्णय, परिपत्रके यासारखे सर्व दस्ताऐवज/कागदपत्रे या परिशिष्टांमध्ये समाविष्ट आहेत.संबंधित दस्ताऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या कागदपत्रांच्या दस्तऐवजांच्या शिरोभागी नमूद केले आहे.**

---

---

## परिशिष्ट - पाच
## प्रलंबित आश्वासनांची अधिवेशननिहाय व विभागनिहाय विवरणे
## (अहवालाचा परिच्छेद क्रमांक २.२ पहावा)

**सन १९९० चे तिसरे अधिवेशन ते सन २०२० चे तिसरे अधिवेशन या कालावधीत सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी पूर्तता न झालेल्या प्रलंबित आश्वासनांच्या विवरणपत्रांची वर्ष व अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी**

---

-----------------------------------------------------------------------------------------------------------

## परिशिष्ट- सहा

### महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त

-----------------------------------------------------------------------------------------------------------

# पहिली बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता कक्ष क्र.१९०३, १९ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती :

(१) प्रा. अनिल सोले, वि.प.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

(३) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव
(३) श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग**

(१) श्री. सतिश पाताडे, कक्ष अधिकारी
(२) श्री.मोहन गंगराडे, सहायक कक्ष अधिकारी

या बैठकीत समितीने सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे विचारात घेऊन त्यावर अभिप्राय व्यक्त केले.

# दुसरी बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक मंगळवार, दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी दुपारी २.०० वाजता कक्ष क्र.१९०३, १९ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती :

(१) प्रा. अनिल सोले, वि.प.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

(३) श्री.गिरिशचंद्र व्यास, वि.प.स.

(४) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

(३) श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग**

श्री. मोहन गंगराडे, सहायक कक्ष अधिकारी

या बैठकीत समितीने सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे विचारात घेऊन त्यावर अभिप्राय व्यक्त केले.

# तिसरी बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक गुरुवार, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता कक्ष क्र.१९०३, १९ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती :

(१) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री.संजय दौड, वि.प.स.

(३) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

(४) विनायक मेटे, वि.प.स.

(५) सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव
उप सचिव (विधी) पदाचा कार्यभार

(२) श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग**

श्री. सतिश पाताडे, सहायक कक्ष अधिकारी

या बैठकीत समितीने सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे विचारात घेऊन त्यावर अभिप्राय व्यक्त केले.

# चौथी बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक मंगळवार, दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दुपारी ३.३० वाजता, कक्ष क्र.१९०३, १९ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

१. श्री. विलास पोतनीस, वि.प.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. संजय दौंड, वि.प.स.
३. श्री. अरुण लाड, वि.प.स.
४. श्री. शरद रणपिसे, वि.प.स.
५. श्री. राजेश राठोड, वि.प.स.
६. श्री. विनायक मेटे, वि.प.स.
७. श्री. सदाशिव खोत, वि.प.स.
८. श्री. रणजितसिंह मोहिते - पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१. श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव
२. श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव
उप सचिव (विधी) पदाचा कार्यभार
३. श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग**

श्री. सतिश पाताडे, कक्ष अधिकारी

या बैठकीत समितीने आपल्या **२०२ व्या** प्रारुप अहवालावर विचार करुन तो संमत केला.